# ‘मोडी’ इतिहास संशोधनाचा मोठा स्त्रोत

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : ‘पुराभिलेख’ मोडी लिपी प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्रासह शिवछत्रपतींचा बहुतांश स्फूर्तीदायी इतिहास कोट्यवधींच्या संख्येने असणाऱ्या मोडी लिपीतील ऐतिहासिक दस्तऐवज व कागदपत्रांत लपला आहे. यामुळे मोडी लिपीचे ज्ञान हा इतिहास संशोधनासाठीचा मोठा स्रोत आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या पुराभिलेख संचालनालयाच्या कोल्हापूर विभागातर्फे मोडी लिपी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. २५ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या या वर्गात तब्बल २२५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला आहे. यात शासकीय अधिकारी व कर्मचारी, शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिक आदींचा समावेश आहे. सोमवारी या वर्गाचे उद्घाटन दसरा चौकातील शहाजी छत्रपती महाविद्यालयातील यशवंतराव




**कोल्हापूर : पुराभिलेख संचालनालयातर्फे आयोजित मोडी लिपी प्रशिक्षण वर्गात मार्गदर्शन करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी डावीकडून सहायक संचालक बा. ना. कुंडले, इतिहास संशोधक इंद्रजित सावंत, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, अभिलेखाधिकारी गणेशकुमार खोडके. (छाया : नाज ट्रेनर)**

चव्हाण सभागृहात झाले. शिवछत्रपती-राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन आणि दीपप्रज्वलनाने उद्घाटन सोहळा झाला.

इतिहास संशोधक इंद्रजित सावंत म्हणाले, मोडी लिपीशिवाय इतिहास संशोधन पूर्ण होऊ शकत नाही. इतिहास संशोधनाबरोबरच भावी पिढीकडे राष्ट्राची संपत्ती असणारा वारसा पोहोचविण्यासाठी मोडी लिपीचे जतन-संवर्धन आणि संरक्षण गरजेचे आहे. मोडी लिपीच्या लिखाण, सरावाबरोबरच वाचनही तितकेच गरजेचे आहे. कोट्यवधी कागदपत्रांचे जतन करणाऱ्या पुराभिलेखागाराचा उपयोग केवळ मालमत्ता, जातीचा दाखला एवढ्याच मर्यादित कारणांसाठी करू नये, असेही त्यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी, मोबाईलमध्ये गुरफटलेल्या लोकांनी त्यातून बाहेर पडण्यासाठी जाणूनबुजून प्रयत्न करावेत. याची सुरुवात मोडी प्रशिक्षण वर्गातून करावी, असे आवाहन केले.

स्वागत सहायक संचालक बाळकृष्ण कुंडले यांनी केले. प्रास्ताविक अभिलेखाधिकारी गणेशकुमार खोडके यांनी केले. सूत्रसंचालन माधुरी चव्हाण यांनी केले. यावळी मोडीतज्ज्ञ शैलेश वाघ, संजय आवळे, विनायक पाटील, विक्रम ठमके, सर्जेराव वाडकर, अमेय जाधव, प्रशांत शिरोलीकर, राहुल जाधव, संदीप हुंबरे, संजय काळे, मनोज क्षीरसागर, राजेश चव्हाण, उमेश पवार आदींसह प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोडी लिपीतून अप्रकाशित इतिहास समोर आणावा

## देवानंद शिंदे : प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महाराष्ट्रासह देशाचा इतिहास मोडी लिपीत लिहून ठेवलेला आहे. आजपर्यंत अनेक संशोधने झाली असली, तरी अद्याप इतिहासातील काही गोष्टी समोर आलेल्या नाहीत. त्यामुळे युवकांनी मोडी लिपीचा अभ्यास करून अप्रकाशित इतिहास समोर आणावा, असे आवाहन कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.



श्री शहाजी कॉलेजच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात सोमवारी पुराभिलेख संचालनालय राज्य शासन यांच्यावतीने आयोजित केलेल्या मोडी लिपी प्रशिक्षणवर्गाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शहाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण होते.

इतिहास अभ्यासक डॉ. इंद्रजित सावंत म्हणाले, शिवकालीन, पेशवेकालीन आणि उत्तरकालीन इतिहासातील मोडी लिपीचा अभ्यास केला पाहिजे. तो इतिहास समोर आलेला नाही. तो संशोधनाच्या माध्यमातून पुढे आणण्याची गरज आहे. कोल्हापूर पुराभिलेखागार अधिकारी गणेश कुमार घोडके, जिल्हा कोषागार अधिकारी महेश कुमार कारंडे, सहायक संचालक बाणा कुंडले यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

### मोडी लिपी उपयुक्त

डॉ. शिंदे म्हणाले, साडेतीनशे वर्षांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यात अनेक संकल्पना रुढ केल्या आहेत. याचा दाखला आपल्याला गड-किल्ल्यांची पाहणी केल्यानंतर कळेल. सातत्याने नवीन इतिहास आणि सत्य इतिहास जगासमोर मांडण्यासाठी मोडी लिपी उपयुक्त ठरेल. मोडी लिपीची कला अवगत केल्यानंतर सांस्कृतिक वारसाचे अनेक पैलू सर्वांच्या समोर येतील.

# मोडीलिपीतून संशोधनाची गरज

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन : मोडिलिपी प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

प्रशिक्षण घेवून मोडी लिपीचे वाचन व लिखाणाचा सराव केला पाहिजे. कारण महाराष्ट्रासह देशाचा खरा इतिहास मोडी लिपीतच लिहून ठेवलेला आहे. आतापर्यंत अनेक संशोधने झाली असली तरी अद्याप इतिहासातील काही गोष्टी समोर आलेल्या नाहीत. त्यामुळे युवकांनी मोडीलिपीचा अभ्यास करून इतिहासाचे संशोधन करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.




कोल्हापूर : मोडिलिपी प्रशिक्षण वर्गाच्या उदघाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, डॉ. इंद्रजित सावंत, गणेशकुमार खोडके, महेशकुमार कारंडे आदी.

महाराष्ट्र शासन पुराभिलेख संचालनालयातर्फे आयोजित मोडिलिपी प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. शहाजी कॉलेजमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण होते.

डॉ. शिंदे म्हणाले, इतिहासकालीन सर्व कागदपत्रे मोडीलिपीत आहेत. सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक, व्यापार, औद्योगिक क्षेत्रातील सर्व नोंदी मोडी लिपीत असल्याने अद्याप बराच इतिहास मराठीत लिहण्याची गरज आहे. शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभाग आणि शाहू संशोधन केंद्राच्या माध्यमातून अनेक मोडी लिपीच्या कागदपत्रांचे मराठीत अनुवाद करून खरा इतिहास पुढे आणला आहे. तरुणांनी गडकिल्ले विशिष्ट पद्धतीने पाहिले पाहिजेत असे मत त्यांनी व्यक्त केले.

इतिहास अभ्यासक डॉ. इंद्रजित सावंत म्हणाले, शिवकालिन, पेशवेकालिन आणि उत्तरकालिन इतिहासातील मोडीलिपीचा अभ्यास केला पाहिजे. अद्याप जो इतिहास समोर आलेला नाही, तो संशोधनाच्या माध्यमातून पुढे आणण्याची गरज आहे. प्राचार्य डॉ. शानेदिवाण म्हणाले, मोडीलिपी शिकण्यासाठी एक वेगळा दृष्टीकोन असला पाहिजे. त्यामुळे तरुणांनी मोडीलिपीत संशोधन करण्याची गरज आहे. यावेळी कोल्हापूर पुराभिलेखाधिकारी गणेशकुमार खोडके, जिल्हा कोषागार अधिकारी महेशकुमार कारंडे,सहाय्यक संचालक बा. ना. कुंडले उपस्थित होते.

# संविधानाच्या निर्मितीतून गुलामगिरीचे जोखड भिरकावून देण्याचे कार्य

## डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांचे प्रतिपादन : संविधान दिनानिमित्त व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतीय संविधानाची निर्मिती करून भारतातल्या कनिष्ठ समजल्या गेलेल्या समाजाच्या मानेवर पारंपरिक व्यवस्थेने लादलेले गुलामगिरीचे जोखड भिरकावून देऊन नष्ट करण्याचे महानकार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने संविधान दिनानिमित्त 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. डॉ. मिरजकर म्हणाले, राष्ट्रनिर्माते डॉ. आंबेडकर यांच्याकडे व्यापक दृष्टीने पाहिले पाहिजे. भारतीय राज्यघटना अस्तित्वात येण्यापूर्वी भारतामध्ये धर्मसूत्रे आणि मनुस्मृतीने निर्माण केलेल्या नियमांमध्ये भारतीय समाजव्यवस्थेमधील शासन, प्रशासन कसे चालेल, याची मांडणी केली होती.

ब्रिटिश साम्राज्यातसुद्धा बाबासाहेबांनी विविध समित्या, गोलमेज परिषदा आदींच्या माध्यमातून समता, सामाजिक न्याय आणि बंधुत्व या मूलभूत मानवी मूल्यांची आग्रही मांडणी केलेली दिसते. भारतीय संविधानाने जनसामान्यांना प्रदान केलेल्या मूलभूत अधिकारांमुळे त्यांना सन्मानाने जगण्याची संधी उपलब्ध झाली आहे.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात संविधान दिनानिमित्त व्याख्यानात बोलताना डॉ. श्यामसुंदर मिरजकर. व्यासपीठावर डॉ. श्रीकृष्ण महाजन. (छाया : नाज ट्रेनर)**

विद्यार्थी, शिक्षकांनी आपापल्या विषयासंदर्भातील भारतीय संविधानाच्या योगदानाचे संशोधन केले पाहिजे. संविधान आत्मीयतेने समजावून घेणे आवश्यक आहे.

डॉ. श्रीकृष्ण महाजन म्हणाले, आता सांविधानिक नितीमत्ता, सांविधानिक भाषा व संविधानातील आशय, तत्त्वज्ञान व व्यवहार यांच्यासंदर्भात स्पष्ट भूमिका घेऊन काम करावे लागणार आहे. अविनाश भाले यांनी प्रास्ताविक केले. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. ए. बी. कांबळे, डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. रामोत्रा, डॉ. पवनकुमार गायकवाड, आनंद खामकर, कुमार कांबळे उपस्थित होते.

# डॉ. आंबेडकर यांच्याकडून गुलामगिरी नष्ट

## डॉ. श्यामसुंदर मिरजकर : शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

भारतीय संविधानाची निर्मिती करून देशात कनिष्ठ समजल्या गेलेल्या समाजाच्या मानेवर पारंपरिक व्यवस्थेने लादलेले गुलामगिरीचे जोखड भिरकावून देऊन ते नष्ट करण्याचे महानकार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे संविधान दिनानिमित्त 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन होते.

डॉ. मिरजकर म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे व्यापक दृष्टीने पाहिले पाहिजे. भारतीय राज्यघटना अस्तित्वात येण्यापूर्वी भारतामध्ये धर्मसूत्रे आणि मनुस्मृतीने निर्माण केलेल्या नियमांमध्ये भारतीय समाजव्यवस्थेमधील शासन, प्रशासन कसे चालेल, याची मांडणी केली होती. भारतीय समाजावर वैदिक परंपरांचा पगडा तत्कालीन शासन व्यवस्थेवर दिसून येत होता. ती व्यवस्था गुलामीची होती. भारतीय संविधानाच्या निर्मितीमधून ही गुलामगिरी डॉ. आंबेडकर यांनी नष्ट केली. भारतीय संविधानाने जनसामान्यांना प्रदान केलेल्या मूलभूत अधिकारांमुळे त्यांना सन्मानाने जगण्याची संधी उपलब्ध झाली आहे. विद्यार्थी, शिक्षकांनी आपापल्या विषयासंदर्भातील भारतीय संविधानाच्या योगदानाचे संशोधन केले पाहिजे.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात संविधान दिनानिमित्त झालेल्या व्याख्यानात बोलताना डॉ. श्यामसुंदर मिरजकर. सोबत डॉ. श्रीकृष्ण महाजन.**

डॉ. श्रीकृष्ण महाजन म्हणाले, आपण आता संविधानिक नीतिमत्ता, संविधानिक भाषा आणि संविधानातील आशय, तत्त्वज्ञान व व्यवहार यांच्यासंदर्भात स्पष्ट भूमिका घेऊन काम करावे लागणार आहे. भोवताली ज्या काही असंवैधानिक गोष्टी घडत असतील, तेथे प्रखर भूमिका घेणे काळाची गरज आहे.

अविनाश भाले यांनी प्रास्ताविक केले. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले. व्याख्यानास डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. ए. बी. कांबळे, डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. रामोत्रा, डॉ. पवनकुमार गायकवाड, कास्ट्राईब संघटनेचे आनंद खामकर, कुमार कांबळे, विविध अधिविभागातील विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सलमान काकतीकर, सचिन देठे, सुशांत पंडित, विक्रम कांबळे यांनी परिश्रम घेतले.

# मुंबई, जामिया विद्यापीठ संघाची आगेकूच

## आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरु चषक क्रिकेट स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी -२० क्रिकेट स्पर्धेत सोमवारी झालेल्या सामन्यात मुंबई विद्यापीठ, जामिया विद्यापीठ दिल्ली संघांनी आपल्या प्रतिस्पर्धी संघावर मात करीत आगेकूच केली.

पहिला सामना मुंबई विद्यापीठ विरुद्ध अकोला विद्यापीठ यांच्यामध्ये झाला. प्रथम फलंदाजी करताना अकोला विद्यापीठ संघाने २० षटकांत सर्वबाद १२१ धावा केल्या. अकोला संघाकडून विवेक सातारने ३३, नीरज सातपुतेने ३० धावा केल्या. गोलंदाजी करताना मुंबई विद्यापीठ संघाकडून संजय भालेरावने तीन, सिद्धेश चव्हाण व श्रीकांत मेढे यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

प्रत्युत्तरादाखल खेळताना मुंबई विद्यापीठ संघाने १६.३ षटकांत दोन बाद १२३ धावा केल्या. यामध्ये चंद्रकांत दासलाबरने नाबाद ४६ धावा केल्या. गोलंदाजी करताना अकोला विद्यापीठ संघाकडून सचिन शिंदे, प्रीतेश तायडे यांनी प्रत्येकी एक गी बाद केला. दुसरा सामना जामिया विद्यापीठ जम्मू संघ विरुद्ध शेर-ए-काश्मीर विद्यापीठ जम्मू यांच्यात झाला. जम्मू संघाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत सात गडी गमावून ११७ धावा केल्या. जामिया विद्यापीठ संघाने गोलंदाजी करताना मोहम्मद फरीदने तीन, सर्फराजने दोन गडी बाद

# हिसार, मुंबई विद्यापीठाचे विजय

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ येथे सुरू असणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत आज झालेल्या सामन्यात हिसार विद्यापीठ आणि मुंबई संघाने प्रतिस्पर्धी संघांवर मात केली. हिसार विद्यापीठाविरुद्ध नांदेड विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामन्यात हिसार विद्यापीठाने विजय मिळवला. हिसार विद्यापीठाने नाणेफेक जिंकत फलंदाजीचा निर्णय घेतला. यामध्ये १९ षटकांमध्ये सर्वबाद १७४ धावा केल्या. यामध्ये अमित यादव याने ४४ धावा केल्या, तर नांदेडकडून रशीद शेख याने ३ तर जयराम हंबर्डे याने २ बळी घेतले. उत्तरादाखल खेळताना नांदेड संघाला निर्धारित २० षटकांत ९ गड्यांच्या मोबदल्यात १३६ धावा करता आल्या. यामध्ये गोविंद सोनटक्के यांनी ४४ धावा केल्या, तर हिसारकडून सुखबीर याने तीन बळी घेतले. मुंबई विद्यापीठ विरुद्ध अकोला विद्यापीठ यांच्यामध्ये झालेल्या सामन्यात मुंबई विद्यापीठाने ८ गडी राखून विजय मिळवला. नाणेफेक जिंकत अकोला संघाने प्रथम फलंदाजी केली. यामध्ये निर्धारित षटकांत सर्वबाद १२१ धावा केल्या. यामध्ये विवेक सुतार याने ३३ धावा केल्या. मुंबईकडून संजय भालेराव याने ३ बळी घेतले. उत्तरादाखल खेळताना मुंबई संघाने १६.३ षटकांमध्ये दोन गड्यांच्या मोबदल्यात १२३ धावा केल्या. यामध्ये चंद्रकांत दासनावर याने नाबाद ४३ धावा केल्या. अकोलाकडून सिद्धेश चव्हाण आणि प्रितेश तायडे यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

# मुंबई, दिल्ली, रोहतक विजयी

## आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा : आज उपांत्यपूर्व फेरीतील चार सामने

प्रतिनिधी
कोल्हापूर

अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी – २० क्रिकेट स्पर्धेत सोमवारी झालेल्या सामन्यांमध्ये मुंबई, दिल्ली, हरीयाणा, रोहतक विद्यापीठांनी प्रतिस्पर्धी संघांवर मात करून उपांत्यफेरीत प्रवेश केला. मंगळवार दि.२६ रोजी सकाळ व दुपार अशा दोन सत्रात उपांत्यपूर्व फेरीतील चार सामने होणार आहेत. यातील दुपारी १ वाजताचा सामना शिवाजी विद्यापीठ विरुध्द रोहतक विद्यापीठ यांच्यात होणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावर सकाळच्या सत्रात झालेल्या सामन्यात जामिया विद्यापीठ दिल्लीने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ७ बाद ११७ धावांचा डोंगर उभारला. यामध्ये निरज मनहासने ५२, प्रेमकुमारने १६ तर महंम्मद रजाकने १५ धावांची खेळी साकारली. दिल्लीकडून गोलंदाजी करताना महंम्मद फरीदने २० धावात ३ तर सरफराजने २ बळी घेतले. उत्तरादाखल खेळताना जामिया दिल्ली संघाने हे लक्ष १७.१ षटकात ४ बाद ११९ धावा करून पूर्ण केले. यामध्ये महंम्मद युसूफने नाबाद ४२, आदिल अहमद नाबाद २१ तर वाहिद महंम्मदने ३१ धावांची खेळी करून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. जम्मूकडून गोलंदाजी करताना मंजितसिंहने २, निसार अहमदने १ बळी घेतला. सामनावीर दिल्लीच्या महंम्मद फरीदला देण्यात आला.



**रोहतकची नागपूरवर ९ विकेटने मात**

राष्ट्रसंत तुकडोजी विद्यापीठ नागपूरने प्रथम फलंदाजी करताना १०.५ षटकात सर्वबाद ७७ धावा केल्या. यामध्ये रितेश कुकारा व सुरज सुर्यवंशी यांनी प्रत्येकी २४ धावांची खेळी केली. नागपूरकडून गोलंदाजी करताना दिपक कुमारने ५ बळी घेऊन रोहतकचा अर्धा संघ गारद केला. तर नरेंद्रकुमारने ३ व पंकज नैनने २ बळी घेतले. उत्तरादाखल खेळताना रोहतक संघाने हे लक्ष अवघ्या ७ षटकात १ बाद ८३ धावा करून सामन्यात विजय संपादन केला. यामध्ये नरेंद्रकुमारने २८ चेंडूत ६१ धावा तर राजकुमारने १५ धावा करून संघाला सहज विजय मिळवून देण्यात मोलाचे योगदान दिले.

**हरीयाणाची नांदेडवर ३८ धावांनी मात**

लाला लजपतराय विद्यापीठ हिस्सार, हरीयाणाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात सर्वबाद १७४ धावा केल्या. यामध्ये अमित यादवने ४४, सुखबीरने ३७ तर प्रदीप सांगवाने ३३ धावांची खेळी करून संघाची धावसंख्या उभारण्यात मोलाचे योगदान दिले. उत्तरादाखल खेळताना नांदेड विद्यापीठ संघाचा डाव २० षटकात ९ बाद १३६ धावात गुंडाळला. यामध्ये गोविंद सोनटक्केने ४४, अजबेर बिदलाने ३० धावांची खेळी करून दिलेली झुंज व्यर्थ ठरली.

**मुंबई विद्यापीठाची अकोला विद्यापीठवर ८ विकेटने मात**

पंजाबराव विद्यापीठ अकोलाने २० षटकात सर्वबाद १२१ धावांचा डोंगर उभारला. यामध्ये विवेक सातारने ३३, निरज सातपूतेने ३० धावांची खेळी केली. मुंबईकडून गोलंदाजी करताना संजय भालेरावने ३, सिध्देश चव्हाणने २ बळी घेतले. उत्तरादाखल खेळताना मुंबई संघाने हे लक्ष अवघ्या १६.३ षटकात २ बाद १२३ धावा करून गाठले. यामध्ये चंद्रकांत दासगांवकर नाबाद ४६ तर सिध्देश चव्हाणने ३७ धावांची वेगवान फलंदाजी करून संघाचा विजय सोपा केला. सामन्यात मुंबईने अकोला विद्यापीठावर ८ विकेटने मोठा विजय संपादन केला. सामनावीर मुंबईकडून नाबाद ४६ धावांची धुंव्वादार फलंदाजी करणाऱ्या चंद्रकांत दासगांवकरला देण्यात आला.



# विद्यापीठात आज कॅन्डल मार्च

कोल्हापूर : मुंबई येथील २६/११ च्य दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना आदरांजली अर्पण करण्यासाठी पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्यावतीने शिवाजी विद्यापीठात आज, मंगळवारी सायंकाळी कॅन्डल मार्च आयोजित केला आहे. विद्यापीठातील मुलींच्या वसतिगृहापासून सायंकाळी पाच वाजता कॅन्डल मार्च सुरु होईल. हा कॅन्डल मार्च विद्यापीठाच्या मुख्य इमारतीपर्यंत काढण्यात येईल. या ठिकाणी शहीद अधिकारी आणि जवानांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात येईल. या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन विभागाच्या प्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

# शिवाजी विद्यापीठात आज कॅन्डल मार्च

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

मुंबई येथे २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना आदरांजली अर्पण करण्यासाठी पत्रकारिता व जनसंवाद विभागातर्फे शिवाजी विद्यापीठात मंगळवार, दि. २६ रोजी सायंकाळी कॅन्डल मार्चचे आयोजन करण्यात आले आहे. पत्रकारिता आणि एम. ए. मास कम्युनिकेशनचे विद्यार्थी गेल्या सात वर्षांपासून विद्यापीठात हा उपक्रम राबवित आहेत. विद्यापीठातील मुलींच्या वसतिगृहापासून सायंकाळी ५ वाजता कॅन्डल मार्च सुरू होईल. या कॅन्डल मार्चमध्ये विद्यापीठाच्या विविध विभागात शिक्षण घेत असलेले विद्यार्थी, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच अन्य नागरिकही सहभागी होणार आहेत. हा कॅन्डल मार्च विद्यापीठाच्या मुख्य इमारतीपर्यंत काढण्यात येईल. याठिकाणी शहीद अधिकारी आणि जवानांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात येईल. याप्रसंगी संविधान दिनानिमित्त विद्यार्थ्यांना दहशतवाद विरोधात तसेच भ्रष्टाचाराच्या विरोधात शपथ देण्यात येईल.